# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# विशेष बातमीपत्र
# कोरोना महाराष्ट्र
# सकाळी 10 वा 10 मि.

**दिनांकः 04.12.2021** **वारः शनिवार**

---

**कोविड-19 विरुद्ध प्रतिबंधक लसीच्या 150 कोटींहून अधिक मात्रा पूर्ण करण्याच्या दिशेनं देश अग्रेसर आहे. कोरोनाचा नवा प्रकार सापडल्यामुळे चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहोत की शक्य तितक्या लवकर लसींच्या दोन्ही मात्रा पूर्ण कराव्या आणि इतरांनाही लस घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. मुखपट्टी, सामाजिक ठिकाणी सुरक्षित अंतर, हात आणि चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करा. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011- 23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

**ठळक बातम्या**

1. ओमिक्रॉन विरुद्ध लढण्यासाठी देशात आवश्यक त्या सर्व उपाययोजना तैनात असल्याची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची लोकसभेत ग्वाही

2. टाळेबंदी शिथिल झाल्यानंतर पुणे जिल्ह्यातील कारखान्यांचे उत्पादन 90 टक्क्यांपर्यंत सुरू

3. राज्यात 7 हजार उपचाराधीन रुग्ण; अनेक जिल्ह्यांमध्ये उपचाराधीन रुग्णांची संख्या नगण्य
4. पुण्याच्या ग्रामीण भागातल्या प्राथमिक शाळा सोमवारपासून सुरू होणार

   आणि

5. लसीकरण वाढवण्यासाठी विविध जिल्हा प्रशासनांच्या प्रभावी उपाययोजना

**मांडवीय-लोक सभा चर्चा**

कोरोनाच्या उत्परिवर्तीत ओमिक्रॉन या विषाणूविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना केली जात असल्याची ग्वाही केंद्रीय आरोग्यमंत्री डॉक्टर मनसुख मंडवीय यांनी काल लोकसभेत दिली. लोकसभेत काल कोविड विषयक दीर्घ चर्चा झाली, त्यात मांडवीय बोलत होते. कर्नाटकात आढळून आलेल्या ओमिक्रॉनचा संसर्ग झालेल्या दोन्ही रुग्णांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी अर्थात जेनोम सिक्वेन्सिंग साठी पाठवण्यात आले असून, त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची

चाचणीही करण्यात येत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. या संसार्गावर उपचार करण्यासाठी देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात अद्ययावत सुविधा असलेलं किमान 50 खाटांचं रुग्णालय उपलब्ध करून देण्यात येईल. त्याच बरोबर रेम्डीझीव्हीर आणि व्हेंटीलेटर सारख्या महत्वाच्या औषधं आणि उपकरणांचं उत्पादन दुप्पट करण्यात आलं असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी या चर्चेला उत्तर देताना दिली. कोविड 19 आजाराशी लढा देण्यात अग्रेसर असलेल्या आरोग्य कर्मचारी आणि कोविड योद्ध्यांची मांडवीय यांनी या वेळी प्रशंसा केली.कोविड19 प्रतिबंधक लसींची वर्धक मात्रा अर्थात बूस्टर डोस देण्याबाबत तज्ञांचं मत घेतल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी यासंदर्भातल्या एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलं.

**राज्य-कोविड आकडेवारी**

राज्यात काल कोरोनाच्या 664 नवबाधितांची नोंद झाली, तर 915 रुग्णांनी कोरोनावर मात केली. काल 16 कोरोना बाधितांच्या मृत्यूची नोंद झाली. राज्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या 7,132 आहे. अनेक जिल्ह्यांमधून काल एकही नवबाधित आढळून आला नाही. गडचिरोली, भंडारा, वाशीम आणि धुळे जिल्ह्यात उपचाराधीन रुग्ण संख्या एक किंवा दोनच आहे.

**मुंबई ओमीक्रॉन**

ओमीक्रॉनचा प्रभाव असलेल्या दक्षिण आफ्रिकेसह युरोपीय देशांमधून आलेल्या नऊ पैकी सात प्रवाशांच्या ‘एस-जिन’ चाचणीचा अहवाल निगेटिव्ह आला आहे.
या प्रवाशांना कोरोना व्यतिरिक्त इतर कोणत्याही विषाणूची लागण झालेली नाही, अशी माहिती मुंबई महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी काल दिली. उर्वरीत दोघांचे अहवाल अजून येणं बाकी आहे, असंही काकाणी यांनी सांगितलं. या बाधितांवर स्वतंत्रपणे करण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र मजला सज्ज ठेवण्यात आला आहे. तसच मुंबई हॉस्पिटल आणि ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्येही खाटा सज्ज ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती काकाणी यांनी दिली.

**पुणे - ओमिक्रॉन**

गेल्या काही दिवसांत पुणे जिल्ह्याच्या विविध भागात परदेशातून आलेल्या एकंदर 66 जणांची माहिती प्रशासनाला मिळाली आहे. कोरोनाच्या ओमिक्रॉन विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर या सर्वांना शोधून, त्यांची आरटीपीसीआर चाचणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**पुणे- टाळेबंदी**

कोरोना संसर्गामुळे लावण्यात आलेली टाळेबंदी उठल्यानंतर पुणे जिल्ह्यातील कारखान्यांचं उत्पादन 90 टक्क्यांपर्यंत सुरू झालं आहे.तर 91 टक्के कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. मराठा चेंबर ऑफ

कॉमर्सच्या वतीने टाळेबंदीनंतर 20 वी पाहणी नुकतीच करण्यात आली. यामध्ये 150 कारखाने सहभागी झाले होते. पाहणीमध्ये सहभागी झालेल्या कारखान्यांपैकी 48 टक्के कंपन्यांचं उत्पादन पूर्ववत सुरू झालं असून, 42 टक्के कारखान्यांचं उत्पादन पूर्ववत होण्यासाठी अजून 6 महिने लागतील, तर 10 टक्के कारखान्यांना पूर्वपदावर येण्यासाठी 6 महिन्यांहून अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे.

**पुणे शाळा**

राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील पहिली ते चौथीच्या वर्गांना प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून  सोमवारपासून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही पहिली ते चौथीचे वर्ग भरणार आहेत. याबाबतचे आदेश पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानं काल काढले. शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार शाळा सुरू कराव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

VC - हिंगोली -

Intro - कोरोना विषाणूचा संसर्ग थोपवण्यासाठी सर्वच जिल्ह्यात लसीकरण वाढवण्यावर भर देण्यात येत आहेत. लसीकरणाचा वेग वाढवण्यासाठी कुठे कारवाईची भीती तर कुठे  बक्षीस योजना राबवण्यात येत आहे. ऐकुया हिंगोली जिल्हा प्रशासन करत असलेल्या उपाययोजनांबाबतची माहिती, आमच्या प्रतिनिधीकडून....

**Script –**

**हिंगोली जिल्ह्यात कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांनी लसीकरणाचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांचे वेतन करू नये असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा कोषागार अधिकारी यांना दिले आहेत. हिंगोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी तर  लस घेणाऱ्या नागरिकांसाठी 'बंपर लसीकरण ड्रॉ ' ही बक्षीस योजना राबवली आहे. 2 डिसेंबर ते 24 डिसेंबर या कालावधीत लस घेणाऱ्या नागरिकांची लकी ड्रॉ आधारे निवड होणार आहे.जिल्हा प्रशासनातर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमांमुळे लसीकरणाचा टक्का नक्कीच वाढेल.आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.**

पुणे जिल्हा-लसीकरण मर्यादा

केंद्र सरकारने 'हर घर दस्तक' या मोहिमेची मुदत वाढवल्यानंतर पुणे जिल्हा प्रशासनानेही 100 टक्के लसीकरणाची आपली कालमर्यादा आता 15 डिसेंबर पर्यंत वाढवली आहे.या काळात जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांना कोरोना प्रतिबंधक लसीची किमान पहिली मात्रा दिली जाणार आहे.  जिल्ह्यातील सुमारे 1 लाख 82 हजार लोकांनी अजून लसीची एकही मात्रा घेतलेली नसल्यानं त्यांना शोधून किमान एक मात्रा तरी त्यांना देण्यासाठी आता 15 डिसेंबर ही मुदत देण्यात आली आहे.यापूर्वीच्या नियोजनानुसार 30 नोव्हेंबर पर्यंत हे लक्ष्य पूर्ण केलं जाणार होतं .

**जळगाव-लसीकरण-वेतन**

जळगाव जिल्ह्यातील जे शासकीय अधिकारी आणि कर्मचारी वैद्यकीय कारणास्तव कोरोना प्रतिबंधक लस घेऊ शकत नाहीत, अशांना पात्र डॉक्टरांच्या प्रमाणपत्राच्या आधारे वेतन देण्यात यावे अशा सूचना जिल्हाधिकारी तसंच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अभिजित राउत यांनी जळगावच्या जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

कोविड प्रतिबंधात्मक एकही मात्र न घेतलेल्या शासकीय अधिकारी तसंच कार्माचार्यांना वेतन देण्यात येऊ नये अशा सूचना जिल्हा प्रशासनाने जारी केल्या आहेत, त्या पार्श्वभूमीवर हे निर्देश देण्यात आले आहेत.

**अकोला जिल्हा-लसीकरण**

अकोला जिल्ह्याने कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचा 15 लाख मात्रांचा टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील अंदाजे 19 लाखांवर नागरिक लसीकरणासाठी पात्र असून, या वर्षीच्या जानेवारीपासून झालेल्या लसीकरण मोहिमेत आतापर्यंत 15 लाखांहून अधिक नागरिकांचं लसीकरण झालं आहे. यात, 10 लाख 32 हजार 803 नागरिकांनी लसीची पहिली मात्रा घेतली असून, 4 लाख 74 हजार 999 नागरिकांनी दोन्ही मात्र घेतल्या आहेत.

**परभणी - लसीकरण**

परभणी  महानगरपालिका प्रशासनाने संपूर्ण शहरात लसीकरण मोहिम युध्द पातळीवर हाती घेतली आहे. आतापर्यंत पालिका हद्दीतील एकंदर  2 लाख 62 हजार 468 नागरीकांचे लसीकरण झाले असल्याची माहिती महानगरपालिकेचे आयुक्त देविदास पवार यांनी दिली.

**ओमिक्रॉन - शिर्डी खबरदारी**

कोरोनाच्या उत्परिवर्तीत ओमिक्रॉन विषाणूचा संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळावर कोरोना विषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना कोपरगावचे तहसीलदार विजय बोरुडे यांनी लेखी आदेशाद्वारे दिल्या आहेत. विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांची कोरोना चाचणी करण्यासाठी कोपरगाव आणि राहाता पंचायत समितीच्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील आरोग्य पथकाची विमानतळावर नेमणूक करण्यात आली आहे. कोरोना चाचणीत पॉझीटीव्ह आढळून आलेल्या व्यक्तीच्या विलगीकरणासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याचे आदेशही तहसीलदारांनी दिले आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं कोरोना महाराष्ट्र हे विशेष बातमीपत्र संपलं, नमस्कार.**